# विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांचे कार्यालय

रामबाग फॉरेस्ट कॉलनी, मुल रोड, चंद्रपूर - 442401 (म.रा.)

दूरध्वनी क्र. 07172-270448 फॅक्स नं. 07172-270448 E-mail :- dfochandrapur@gmail.com

**विषय** :- Diversion of 36.98 ha. Reserved Forest land in favour of Western Coal Field Ltd. (WCL), Chandrapur area for Hindusthan Lalpeth (Expansion) Opencast Project at Reserved Forest Compartment No. 485 in Chandrapur Forest Division under Section 2 of the Forest (Conservation) Act, 1980 in Chandrapur District in the State of Maharashtra.

**क्रमांक** :- कक्ष-14/सर्व्हे/जमीन/ 565

चंद्रपूर, दिनांक 29/6/018

प्रति,

क्षेत्रीय महाप्रबंधक,
वेस्टर्न कोल फिल्ड लिमी.
चंद्रपूर क्षेत्र.

क्षे.महाप्र./वरि.नि.स./संचारण/......दि.......
AGM./Sr.PA/Movt/ 2566 Dt. 12.7.18

संदर्भ :- 1. केंद्र शासनाचे पत्र क्रमांक F.No.8-115/1995-FC (Vol.), दिनांक 16/04/2018.
2. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-17/नोसेल/1/आयडी-12402/370/18-19, दिनांक 16/05/2018 व पत्र क्र. 554, दिनांक 06/06/2018.
3. उपक्षेत्रीय प्रबंधक, हिंदुस्थान लालपेठ सब एरिया यांचे पत्र क्रमांक WCL/CHA/SAM/HLSA/26/543, दिनांक 22/05/2018.

संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडण्यांत येत आहे. त्याचे अवलोकन करावे. विषयांकीत प्रकरणी संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये केंद्र शासनाने अटींचे अधीन राहून वनजमीन वळतीकरणास तत्वत: मान्यता दिलेली आहे. तरी खालीलप्रमाणे अटनिहाय अटी पूर्तता अहवाल सादर करण्यांत यावा.

1. अट क्रमांक 1 च्या अनुषंगाने प्रमाणपत्र सादर करण्यांत यावे. Undertaking
2. अट क्रमांक 2 च्या अनुषंगाने 36.98 हे. करीता 36.98 x 6,26,000/- = 23149480/-
3. अट क्रमांक 2 च्या अनुषंगाने वळती करण्यांत येणाऱ्या 36.98 हेक्टर क्षेत्राच्या दुप्पट 73.96 हेक्टर क्षेत्रात पर्यायी रोपवन घेण्याकरीता सन 2018-19 चे पर्यायी वनीकरणाचे प्रती हेक्टर रूपये 5,46,176/- x 73.96 हे. = 4,03,95,176.96/- किंवा 4,03,95,177/- रूपयाचा भरणा Ad-Hoc CAMPA मध्ये करण्यांत यावा.
4. अट क्रमांक 4 च्या अनुषंगाने पर्यायी वनीकरणाच्या 25 टक्के म्हणजे 4,03,95,177/- x 25% = 1,00,98,794.25/- किंवा 1,00,98,795/- रूपयाचा भरणा Ad-Hoc CAMPA मध्ये करण्यांत यावा.
5. अट क्रमांक 5 मधील सूचनांप्रमाणे FRA 2006 अंतर्गत मागणी केलेला अहवाल सादर करावा. Copy of FRA
6. अट क्रमांक 6 च्या अनुषंगाने दिलेल्या सूचनांप्रमाणे यंत्रणेने स्वखर्चाने बाधीत होणाऱ्या 36.98 हेक्टर वनक्षेत्राच्या व सेफ्टी झोन क्षेत्राच्या सभोवताल 4 फुट उंचीचे RCC Boundary Pillar रोवून सदर पिल्लर्सचे DGPS Co-ordinate घेण्यांत येवून तसा नकाशा तयार करण्यांत यावा व सदरचे सिमांकनाचे काम वनविभाग व महसुल विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यांत यावे. Erection of Pillars and collect DGPS Coordinates and Undertaking.
7. अट क्रमांक 7 च्या अनुषंगाने पर्यायी वनीकरणाचे क्षेत्राचे सर्व्हेक्षण सिमांकनाकरीता प्रती हेक्टर 1 मनुष्य दिवस याप्रमाणे रूपये 339.62/- x 73.96 हे. = 25,119/- रूपये व सिमेवर 50 RCC पिल्लर्स तयार करणे व

SO (AP) SAM Lalpeth Area SA 12/7/18

रोवण्याकरीता येणारा खर्च 50 x 1,500/- = 75,000/- रूपये असे एकूण 1,00,119/- रूपयाचा भरणा Ad-Hoc CAMPA मध्ये करण्यांत यावा. CA Survey / Pillars – Payment

8. अट क्रमांक 8 च्या अनुषंगाने बाधीत वनक्षेत्राचा स्फोटके ठेवण्याकरीता उपयोग करण्यांत येवू नये याबाबत प्रमाणपत्र देण्यांत यावे. Undertaking

9. अट क्रमांक 9 च्या अनुषंगाने बाधीत होणाऱ्या 36.98 हेक्टर वनक्षेत्राचा उपयोग ओवर बर्डन डम्पींग कामाकरीता करण्यांत येवू नये याबाबत हमीपत्र देण्यांत यावे.

10. अट क्रमांक 10 मध्ये सूचित करण्यांत आल्याप्रमाणे लिज क्षेत्राच्या बाहेरील बाजूस प्रस्तावात प्रस्तावित केल्याप्रमाणे 7.5 मीटरप्रमाणे 1.94 हेक्टर सेफ्टी झोन क्षेत्रात ग्रीन बेल्ट तयार करण्याचे काम यंत्रणेने स्वखर्चाने करावे.

11. अट क्रमांक 11 च्या अनुषंगाने दिलेल्या सुचनांप्रमाणे सेफ्टी झोन क्षेत्रातील झाडोऱ्याचे सुरक्षेकरीता आवश्यक ठिकाणी कुंपन करण्यांत यावे.

12. अट क्रमांक 12 च्या अनुषंगाने प्रस्तावित सेफ्टी झोन क्षेत्र 1.94 हेक्टर x 1.5 पट = 2.91 हेक्टर अवनत वनक्षेत्रात पर्यायी वनीकरण घेण्याकरीता येणाऱ्या खर्चाची रक्कम 2.91 x 5,46,176/- = 15,89,372.16/- किंवा 15,89,373/- रूपयाचा भरणा Ad-Hoc CAMPA मध्ये करण्यांत यावा.

13. अट क्रमांक 13 च्या अनुषंगाने CMPDI, Nagpur यांच्या मंजूर मायनिंग प्लॅनप्रमाणे वनक्षेत्र Reclaim करून वनविभागास परत करण्यांत यावा.

14. अट क्रमांक 14 च्या अनुषंगाने वनक्षेत्र मंजूर मायनिंग प्लॅनप्रमाणे Reclaim करून Periodically वनविभागास हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करावी.

15. अट क्रमांक 15 प्रमाणे Wildlife Mitigation करीता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांच्याकडून मंजूर करण्यांत आलेल्या प्लॅनप्रमाणे 50.00 लक्ष रूपयाचा भरणा करण्यांत यावा.

16. अट क्रमांक 16 प्रमाणे पर्यायी वनीकरण घेण्यांत येणारे क्षेत्र सर्व्हे ऑफ इंडियाच्या टोपोशिट 1:50,000 स्केलमध्ये दर्शविण्यांत यावे.

17. अट क्रमांक 17 प्रमाणे पर्यायी वनीकरण करण्याकरीता येणाऱ्या खर्चाची रक्कम चालु दराप्रमाणे व दिलेल्या सूचनांप्रमाणे Ad-Hoc CAMPA मध्ये ऑनलाईन पोर्टलद्वारे भरणा करण्यांत यावी.

18. अट क्रमांक 18 प्रमाणे NPV ची रक्कम Ad-Hoc CAMPA मध्ये ऑनलाईन पोर्टलद्वारे भरणा करण्यांत यावी.

19. अट क्रमांक 19 च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे NPV च्या रक्कमेत वाढ झाल्यास वाढीव रक्कम भरणा करण्यांत येईल याचे हमीपत्र देण्यांत यावे.

20. अट क्रमांक 20 च्या अनुषंगाने दिलेल्या सूचनांप्रमाणे a ते e अन्वये दिलेल्या सूचनांप्रमाणे वनविभागाच्या सहकार्याने आवश्यक प्लॅन व स्कीम तयार करून सदर योजनाची स्वखर्चाने अंमलबजावणी करण्यांत यावी.

21. अट क्रमांक 21 प्रमाणे पर्यायी वनीकरण व NPV ची रक्कम ऑनलाईन वेब पोर्टलद्वारे भरणा केल्याशिवाय Stage-I Compliance स्विकारण्यांत येणार नाही.

22. अट क्रमांक 22 प्रमाणे Lease Agreement बाबत दस्ताऐवज सादर करावा.

23. अट क्रमांक 23 च्या अनुषंगाने दिलेल्या सूचनांप्रमाणे मंजूर योजनेप्रमाणे क्षेत्र हस्तांतरणाची कार्यवाही करण्यांत यावी.

24. अट क्रमांक 24 प्रमाणे Gap Planting करण्यांत येत असल्याचे हमीपत्र सादर करण्यांत यावे.

25. अट क्रमांक 25 प्रमाणे R&R Plan सादर करण्यांत यावा.

26. अट क्रमांक 26 प्रमाणे Dumping Area मध्ये वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली रोपवन घेण्याची कार्यवाही करण्यांत यावी. त्याबाबतची योजना सादर करण्यांत यावी.

27. अट क्रमांक 27 च्या अनुषंगाने Environment Clearance बाबत माहिती सादर करावी.

28. अट क्रमांक 28 च्या अनुषंगाने आवश्यक तिथेच वनविभागाच्या मार्गदर्शनाप्रमाणे वृक्षतोड करण्यांत यावी, याबाबत हमीपत्र देण्यांत यावे.

29. अट क्रमांक 29 च्या अनुषंगाने प्रस्तावित मंजूर प्लॅन केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय बदलण्यांत येवू नये.

30. अट क्रमांक 30 प्रमाणे वनक्षेत्रात लेबर कॅम्प वसविण्यांत येवू नये.

31. अट क्रमांक 31 प्रमाणे कामगारांना इंधन म्हणून लाकडाचा पूरवठा करण्यांत येवू नये. त्यांच्या इंधनाची सोय वेगळ्याने करण्यांत येत असल्याबाबत हमीपत्र सादर करावे.

32. अट क्रमांक 32 च्या अनुषंगाने हमीपत्र सादर करावे.

33. अट क्रमांक 33 च्या अनुषंगाने ज्या कारणाकरीता वनक्षेत्र वळती करण्यांत आलेले आहे त्याच कारणाकरीता वनक्षेत्र वापरण्यांत येईल याबाबत हमीपत्र देण्यांत यावे.

34. अट क्रमांक 34 प्रमाणे कोणत्याही परिस्थितीत केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय दुसऱ्या यंत्रणेस वळती करण्यांत आलेले वनक्षेत्र हस्तांतरीत करण्यांत येवू नये, याबाबत हमीपत्र सादर करावे.

35. अट क्रमांक 35 प्रमाणे कोणत्याही कारणाने लगतच्या क्षेत्रातील वन व वन्यजीव यांना नुकसान पोहोचणार नाही याबाबत हमीपत्र सादर करावे.

36. अट क्रमांक 36 च्या अनुषंगाने दिलेल्या सूचनांप्रमाणे वार्षिक अहवाल सादर करण्यांत यावा.

37. अट क्रमांक 37 प्रमाणे या व्यतिरिक्त वेळोवेळी घालून दिलेल्या अटींची पूर्तता करण्यांत येईल, याबाबत हमीपत्र देण्यांत यावे.

38. अट क्रमांक 38 प्रमाणे सर्व कायद्याअंतर्गत तसेच सर्वोच्च न्यायालयाचे आदेश व राष्ट्रीय हरीत लवाद यांनी वेळोवेळी दिलेले आदेशाची पूर्तता करण्यांत येईल, याबाबत हमीपत्र सादर करावे.

**सहपत्र :-** वरीलप्रमाणे.

विभागीय वन अधिकारी,
चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर

**मुळ प्रत वि.व.अ. याचेकडुन** अनुमोदीत

**प्रतिलिपी :-** मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सविनय सादर.

**प्रतिलिपी :-** वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.), चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित. विषयांकीत प्रकरणी सेफ्टी झोन क्षेत्राच्या 1.5 पट पर्यायी वनीकरण घेण्याकरीता लागणारे 2.91 हेक्टर अवनत वनक्षेत्राचा शोध घेवून तात्काळ स्थळदर्शक नकाशा व उपचार नकाशा सादर करावा.

**विभागीय वन अधिकारी,**
**चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर**